महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२६/प्र.क्र.००७/सीईटी/२०२६/२१८७ दिनांक-०७.०९.२०२६

# परिपत्रक

संदर्भ: १. मा. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश दिनांक १२/०८/२०२६ (MA No. २३८०/२०२६).
२. एआयसीटीई (AICTE) चे सुधारित शैक्षणिक वेळापत्रक दिनांक १३/०८/२०२६.

मा. सर्वोच्च न्यायालय आणि एआयसीटीई (AICTE) द्वारे जारी केलेल्या आदेशांनुसार, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील तंत्रशिक्षणांतर्गत विविध पदवी आणि पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची अंतिम तारीख सुधारित करून **१४ सप्टेंबर २०२६** अशी निश्चित करण्यात येत आहे. ही तारीख केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया आणि संस्थात्मक पातळीवरील फेऱ्यांसह सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी अंतिम मानली जाईल.

तसेच सुरु असलेल्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्यांमध्ये किंवा संस्थात्मक रिक्त जागांच्या फेऱ्यांमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व पात्र उमेदवारांनी हे सुनिश्चित करावे की, त्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया, शुल्क भरणे आणि पोर्टलवरील सिस्टीम रिपोर्टिंग हे सर्व या अंतिम मुदतीपूर्वी पूर्ण करण्यात यावे, याची विद्यार्थी/ पालक/ संस्था यांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)**
**महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा**
**(सीईटी) कक्ष, मुंबई**